सकाळ


# विद्यापीठांच्या ९ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठाने घेतलेल्या ९ परीक्षांचे निकाल आज जाहीर झाले. यामध्ये विधी शाखा, बी.आय.डी, बी.ए.(मल्टिमीडिया), एम.पी.ए. (ड्रामा), बी.एस.सी (फूड टेक्नॉलजी) या परीक्षांचा समावेश आहे. यंदा परीक्षा ऑनलाईन झाल्या असून निकालही ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात आले आहेत, अशी माहिती परीक्षा विभागाकडून देण्यात आली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत 'महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रीत गट ब संयुक्त पूर्व परीक्षा आज घेण्यात आली. त्यामुळे विद्यापीठाच्या या दिवशी होणाऱ्या परीक्षा झाल्या नाहीत. या सर्व परीक्षा रविवारी (ता.५) होणार आहेत.

# शिक्षकांच्या सन्मानार्थ माजी विद्यार्थ्यांचा कृतज्ञता निधी

## संख्याशास्त्र अधिविभागात चार शिक्षकांच्या नावे शिष्यवृत्ती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**




शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातील माजी विद्यार्थ्यांनी कृतज्ञता निधी संकलित करून विभागातील चार निवृत्त शिक्षकांच्या नावे होतकरू व गरजू विद्यार्थ्यांसाठी रोख रकमेच्या चार शिष्यवृत्ती प्रदान करून त्यांचा सन्मान करण्याचे ठरविले आहे. दरवर्षी शिक्षक दिनी (दि. ५ सप्टेंबर) शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येईल.

विद्यापीठातील संख्याशास्त्र अधिविभागाची पायाभरणी करणाऱ्या प्रमुख शिक्षक - संख्याशास्त्रज्ञांमध्ये प्रा. एम. एस. प्रसाद, प्रा. आर. एन. रट्टीहळ्ळी, प्रा. एस. आर. कुलकर्णी व प्रा. बी. व्ही. धांद्रा यांचा समावेश आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १९८४ ते १९९५ या कालावधीत एम.एस्सी. व पीएच.डी. संशोधन पूर्ण केलेल्या माजी विद्यार्थ्यांनी या प्राध्यापकांच्या योगदानाच्या कायमस्वरूपी सन्मान स्मृती जपण्याच्या भावनेतून त्यांच्या नावे चार विविध शिष्यवृत्ती देण्याचे ठरविले. त्यानुसार त्यांनी सुमारे पाच लाख रुपयांचा कृतज्ञता निधी उभारला असून हा निधी विद्यापीठाकडे वर्ग करण्यात आला आहे. निधीच्या व्याजातून अधिविभागात एम.एस्सी. प्रथम व द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या प्रत्येकी दोन याप्रमाणे चार होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची शिष्यवृत्ती दरवर्षी शिक्षक दिनास प्रदान करण्याचे ठरले आहे.

# विद्यापीठातर्फे शनिवारचे सर्व पेपर आज होणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च-एप्रिल २०२१ च्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने सुरू झाल्या आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत 'महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट ब संयुक्त पूव'परीक्षा २०२०' ही परीक्षा शनिवारी (दि. ४) झाली. या दिवशी होणारे सर्व पेपर हे रविवारी (दि. ५) पूर्वी जाहीर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे होणार आहेत.

अद्याप ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू झालेली नाही, त्यांनी मॉक टेस्ट सत्वर द्यावी. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे संकेतस्थळ, ई-मेल व नोंदणीकृत मोबाईल वारंवार पाहून पुढील कार्यवाही करावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी महाविद्यालयास केले आहे. शनिवारी ९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. यात बीआयडी सत्र-५ व ६, बीए (मल्टिमीडिया) सत्र- ५ व ६, एमपीए (ड्रामा) थिएटर आर्टस् पार्ट-२, बी.एस्सी.-फूड टेक्नॉलॉजी सत्र-५ व ६, पाच वर्षे विधी आदी परीक्षांचा यात समावेश आहे.

# आर. मुकुंदन यांचे मंगळवारी विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने मंगळवारी (दि. ७) टाटा केमिकल लि. चे सीईओ आर. मुकुंदन यांचे "इनोवेटिंग लीव्हरेजिंग सस्टेनेबिलिटी आणि डिजिटल अपॉर्च्युनिटी इनइंडिया" या विषयावर व्याख्यान होणार आहे. झूम या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर दुपारी२.४५ वाजता होणाऱ्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील, अशीमाहिती विभागाचे प्रमुख प्रा. ज्ञानदेव तळुले यांनी दिली.अर्थशास्त्र विभागाच्या वतीने देश विदेशातील नामवंत अर्थतज्ज्ञ तसेच शास्त्रज्ञाची व्याख्यानमाला आयोजितकरण्यात आली आहे. यावेळी प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. यशवंत थोरात, प्रा. ज्ञानदेव तळुळे आदीउपस्थित राहणार आहेत. विद्यापीठाच्या वेबसाईटवर लेक्चर सेरीज इन इकॉनोमिक्स येथे व्याख्यानाचीलिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे